# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### ठाणे जिल्हयातील भातसा प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या कुटुंबाच्या पुनर्वसनाचा आराखडा प्रलंबित असल्याबाबत

**(१) ३०३ (२३-१२-२०१४). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील भातसा प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या कुटुंबाच्या रितसर पुनर्वसनासाठी व त्यांना १८ मुलभुत सुविधा पुरविण्याच्या संबंधीचा आराखडा प्रकल्पाच्या कार्यकारी अधिका-यांनी सुमारे १ वर्षापूर्वी पाठवूनही पुनर्वसन मंत्रालयाने सदर आराखडा पूर्ण केला नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर आराखडा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०७-०३-२०१५) :**(१) भातसा धरणासाठी भुसंपादनाची प्रक्रीया पुनर्वसन कायदा १९७६ लागू होण्यापूर्वी झाली आहे. सन १९९९ मध्ये पुनर्वसन कायद्यात झालेल्या सुधारणानुसार प्रकल्प बाधितांचे पुनर्वसन विषयक कार्यवाही जिल्हा पुनर्वसन अधिकारी, ठाणे यांचे स्तरावरुन चालू आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही. तथापि, भातसा धरण पुनर्वसन कायदा सन १९७६ पारित होण्यापूर्वीचे असल्याने प्रकल्प बाधितांचे पुनर्वसन विषयक कार्यवाहीसाठी कोकण पाटबंधारे विकास महामंडळाचे भातसानगर वसाहतीमधील १५.३३ हेक्टर जागा देण्यास पत्र क्र.२३५५ दि.०४.०८.२०१४ अन्वये तत्वत: मान्यता दिली आहे. त्याअनुष्रंगाने पुढील कार्यवाही जिल्हा पुनर्वसन अधिकारी, ठाणे यांचेकडे प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**केळवणे ते वरोणी (ता.उरण, जि.रायगड) येथील बंधाऱ्यांची दुरवस्था झाल्याबाबत**

**(२) ७१० (२२-१२-२०१४). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केळवणे ते वरोणी (ता.उरण, जि.रायगड) येथील बंधारा अत्यंत नादुरुस्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नादुरुस्त बंधारा फुटल्यास सुमारे २००० ते २५०० एकर शेतीचे नुकसान होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बंधा-याच्या दुरुस्तीकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०७-०३-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.

केळवणी खाजगी खारभूमी बंधारा नादुरुस्त आहे.

(२) केळवणे खाजगी खारभूमी योजनेचे अंदाजे एकूण तिनशे हेक्टर क्षेत्रामध्ये खारे पाणी घुसले होते. त्यामुळे लाभक्षेत्र बाधीत झाले आहे. वसेणी व पुनाडे या खाजगी खारभूमी योजनांचे नुकसान झालेले नाही.

(३) कळविणे ते वसेणी या भागात कोनी केळवणे, पुनाई व वसेणी या खाजगी खारभूमी योजनांचा समावेश आहे. या सर्व खाजगी खारभूमी योजना असल्यामुळे त्यावर शासनामार्फत खर्च केला जात नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सुलवाडे-जामफळ उपसा जलसिंचन योजनेचे (ता.शिंदखेडा, जि.धुळे)**
**काम निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(३) ८१६ (२४-१२-२०१४). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुलवाडे-जामफळ उपसा जलसिंचन योजना (ता.शिंदखेडा, जि.धुळे) या योजनेला सन १९९९ मध्ये मंजूरी देण्यात येवून देखील अद्याप या योजनेचे काम सुरू करण्यात आलेले नाही त्यामुळे शिंदखेडा तालुक्यातील ४८ गावांना सातत्याने दुष्काळाशी सामना करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेमुळे कायमस्वरुपी दुष्काळी असणा-या शिंदखेडा तालुक्यातील ४८ गावांचा सिंचनाचा व पिण्याचा पाण्याचा प्रश्न सुटणार असतांना देखील केवळ निधी अभावी ही योजना प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेला निधी द्यावा म्हणून सातत्याने लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त योजनेला निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०७-०३-२०१५) :**(१) सदर योजनेचे काम अद्याप प्रत्यक्ष सुरु झाले नाही, ही बाब खरी आहे.
(२) या योजनेद्वारे शिंदखेडा तालुक्यातील ४८ गावातील २६९०७ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार आहे.
(३) होय.
(४) महामंडळांतर्गत बांधकामाधीन प्रकल्पांसाठी मा. राज्यपाल यांचे निर्देशानुसार व ठरवून दिलेल्या जिल्हानिहाय सुत्रानुसार निधी उपलब्ध होतो.
सन २०१४-१५ आर्थिक वर्षासाठी रु. २५०.०० लक्ष इतकी तरतूद करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर शहरातील पंचगंगा नदीतील पाण्याचे प्रदुषण कमी करण्याबाबत**

**(४) १०७६ (२२-१२-२०१४). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर शहरातील पंचगंगा नदीतील पाण्याचे प्रदुषण कमी करण्यासाठी सध्या नदीत सोडल्या जाणा-या पाण्यापेक्षा जादा पाणी सोडणे जलसंपदा विभागाला शक्य नसल्याचे माहे एप्रिल, २०१४ मध्ये सांगण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच पंचगंगा प्रदूषित होऊ लागल्यामुळे नदीकाठावरील नागरिक तसेच इचलकरंजीतील नागरिकांनी पंचगंगा नदी प्रवाहित ठेवावी अशी मागणी इचलकरंजी नगरपालिकेच्या मुख्याधिका-यांसह नगरसेवकांनी दिनांक २५ एप्रिल, २०१४ रोजी जिल्हाधिका-यांना केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०७-०३-२०१५) :**(१) होय, अंशतः खरे आहे.
दिनांक २६/११/२०१३ रोजी जिल्हाधिकारी व आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका यांचे समवेत झालेल्या बैठकीत प्रदूषण कमी करण्यासाठी जादा पाणी सोडता येणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले होते.
(२) होय.

याबाबत अध्यक्षा इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी यांनी दि.२२.४.२०१४ रोजी जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना पत्र दिलेले आहे.
(३) पंचगंगा नदीवरील धरणातील उपलब्ध पाणीसाठ्यानुसार शेतीस व बिगर सिंचनासाठी पाणी देण्याचे नियोजन केले असल्याने त्या व्यतिरिक्त पंचगंगा नदीतील प्रदुषणाची तीव्रता करण्यासाठी अतिरिक्त विसर्ग नदीपात्रात पाणी सोडून नदी प्रवाही ठेवणे जलसंपदा विभागास सद्यस्थितीत शक्य नाही.

---

**महाराष्ट्र राज्यात लॉटरीचा व्यवसाय करण्यासाठी शासनाने अन्य दहा राज्यांच्या लॉटरी कंपन्यांना परवानगी दिल्याबाबत**

**(५) १४२५ (२२-१२-२०१४). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्यात लॉटरीचा व्यवसाय करण्यासाठी शासनाने अन्य दहा राज्यांच्या लॉटरी कंपन्याना परवानगी दिलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या लॉटरी कंपन्या बनावट ड्रॉ काढतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या लॉटरी कंपन्याकडून राज्याला अत्यल्प प्रमाणात रॉयल्टी मिळते, हे ही खरे आहे काय,
(४) या प्रकारामुळे राज्याचे करोडो रुपयांचे नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाने संबंधितांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-०३-२०१५) :**(१) नाही. सध्या राज्यात गोवा, सिक्कीम व मिझोराम या तीन राज्यात पेपर व ऑनलाईन लॉटरी सोडतीची विक्री करणाऱ्या ४ कंपन्यांकडून लॉटरी सोडतीची विक्री केली जात आहे.
(२) केंद्र शासनाच्या "द लॉटरीज (रेग्युलेशन) ॲक्ट, १९९८ व द लॉटरीज (रेग्युलेशन) अल्स", २०१० मधील तरतूदीनुसार फक्त राज्य सरकारच लॉटरी चालवू शकतात. त्यानुसार लॉटरी चालविणे डॉ काढणे व बक्षिसे प्रदान करणे ही संबंधीत आयोजक राज्याची जबाबदारी आहे.
(३), (४) व (५) नाही, महाराष्ट्र राज्याच्या लॉटरीसह इतर राज्यांच्या लॉटरी योजनांवर महाराष्ट्र शासन, वित्त विभाग अधिनियम क्र. मुवक १५१३/प्र/क्र/५७/कराधान १ दिनांक २५.४.२०१३ मधील विहित तरतुदींनुसार लॉटरी कर प्रथम प्रवर्तकाकडून आगाऊ वसूल करुन शासनाच्या खाती जमा केला जातो.

---

**मोहोळ मतदार संघातील तिन्ही तालुक्यात विविध कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(६) २२०१ (२३-१२-२०१४). श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहोळ मतदार संघातील तिन्ही तालुक्यात सध्या महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजने अंतर्गत सामाजिक वनीकरणाची तसेच पाणंद रस्ते गावातील अंतर्गत रस्ते तसेच नविन विहिरीची कामे संपूर्णपणे बंद आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्व कामे बंद राहण्याची कारणे काय आहेत,
(३) मजूरांना रोजगार मिळावा यासाठी रोजगार हमीची कामे पूर्ववत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-०६-२०१५)** :(१) व (२) मोहोळ तालुक्यात एकूण १५ गाम पंचायती असुन मोहोळ मतदारसंघातील तिनही तालुक्यात सद्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत पाणंद रस्ते, गावातील अंतर्गत रस्ते तसेच नविन विहिरींवी कामे मजूरांकडून ग्रामपंयातीकडे कामाची मागणी न आल्यामुंळे बंद आहेत.

तथापि, लागवड अधिकारी मोहोळ यांचेमार्फत एकूण १७ कामे रोपवाठीका, रस्ता दुतर्फा वृक्ष लागवड , गट लागवड, विखुरलेल्या स्वरुपात वृक्ष लागवड ही कामे सन २०१३-१४ पासून सूरु असल्यामुळे ही कामे सन २०१४-१५ मध्ये ही सुरु ठेवण्यात आली आहेत. तसेच वनपरिक्षेत्र अधिकारी मोहोळ यांचेमार्फत १ काम सुरु असुन सहाय्यक अभियंता श्रेणी १ सार्वजनिक बांधकाम विभाग मोहोळ मार्फत १ जोडरस्त्याचे काम सुरु आहे.
(३) मजुरांना रोजगार मिळावा यासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सद्यस्थितीत मोहोळ मतदार संघातील ग्रामपंचायतीमध्ये १६० विहीरी पुनर्भरण कामास मंजुरी देण्यात आलेली आहे. तसेच जलसंधारण स्वरुपाच्या कामांना (कम्पार्टमेंट बंडीग व माती नालाबांध) प्राधान्याने प्रशासकीय मंजुरी क्षेत्रिय स्तरावर देण्यात येत आहे. त्यामुळे येणाऱ्या कालावधीत मजुरांची मागणी प्राप्त होताच कामे सुरु करता येतील.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**टेंभू योजनेअंतर्गत तीन जिल्हयातील सात तालुक्यातील कामाच्या सद्य:स्थितीबाबत**

**(७) ३००४ (२३-१२-२०१४). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) टेंभू योजने अंतर्गत तीन जिल्हयातील सात दुष्काळी तालुक्यातील जमिनीला पाणी देण्यासाठी युतीच्या काळात १४१६.५९ कोटी रुपये किमतीच्या प्रकल्पास मंजूरी देवून काम सुरु केले होते, हे खरे आहे काय,
(२) या प्रकल्पाची सुधारित किंमत किती झाली आहे व प्रकल्पाची सध्यस्थिती काय आहे,
(३) सदरहू योजना केंद्रशासनाच्या वेगवर्धीत सिंचन लाभ योजनेमध्ये घालण्याच्या दृष्टीने शासनाने काही प्रयत्न केले आहेत काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०७-०३-२०१५)** :(१) होय.

(२) प्रकल्पाची सन २००९-१० च्या दरसूचीनुसार व्दितीय सुधारीत प्रशासकीय अहवालाची किंमत रु. ३८३२.९८ कोटी असून सदर अहवालावर शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे. प्रकल्पाचे जवळजवळ ६० टक्के काम पूर्ण झाले असून योजनेच्या एकूण ५ टप्प्यापैकी ३ टप्याचे कार्यान्वितीकरण पूर्ण होऊन योजनेचे पाणी ७ तालुक्यांपैकी कवठेमहंकाळ तालूका वगळता ६ तालुक्यामध्ये पोहचले आहे.

(३) टेंभू प्रकल्पाचा अंतर्भाव केंद्र शासनाच्या वेगवर्थित सिंचन लाभ कार्यक्रमामध्ये करण्याबाबतचा प्रस्ताव केद्र शासनास सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी येथील जलसंपदा विभागातील, सहाय्यक अभियंता यांनी अनुसूचित जमातीच्या बनावट प्रमाणपत्राआधारे राखीव प्रवर्गातून नोकरी मिळविल्याबाबत

**(८) ३१४९ (२३-१२-२०१४). श्री.मोहन फड (पाथरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथील जलसंपदा विभागातील श्री.आशुतोष ओमप्रकाश राठोर, सहाय्यक अभियंता श्रेणी १ यांनी अनुसूचित जमातीच्या बनावट प्रमाणपत्राआधारे राखीव प्रवर्गातून नोकरी मिळवून शासनाची फसवणूक केल्या प्रकरणी माजी खासदार ॲड.सुरेश जाधव, परभणी यांनी प्रधान सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे दिनांक २५ ऑगस्ट, २०१४ रोजी सविस्तर तक्रार देवून चौकशीची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार दोषीवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (११-०२-२०१५)** :(१) होय.

(२) महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा परिक्षा-२००४ च्या अंतिम निकालाच्या आधारे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून श्री.आशुतोष ओमप्रकाश राठोर यांची अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातून (मेरीट क्र. १२९) सन २००६ मध्ये सहाय्यक अभियंता श्रेणी-१ (स्थापत्य) गट-अ या पदाकरीता जलसंपदा विभागात शिफारस करण्यात आली होती. नियुक्तीच्या प्रक्रीयेच्या वेळी श्री. राठोर यांच्या जात वैधता प्रमाणपत्राबाबतचा निर्णय प्रलंबीत असल्याने त्यांना वगळून इतर उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली होती. श्री.राठोर यांनी जात प्रमाणपत्राच्या वैधतेबाबत निर्णय लवकर घेण्याकरिता विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, औरंगाबाद याच्या विरुध्द मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ, येथे रिट याचिका क्र. २१०६/२००७ दाखल केली होती.

यासंबंधी मा.उच्च न्यायालयाने सदर जाती वैधता प्रमाणपत्राबाबतचे प्रकरण तात्काळ निकाली काढण्याबाबत विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती औरंगाबाद यांना सूचना दिल्या व सदर जाती वैधता प्रमाणपत्राबाबतचा निर्णय होई पर्यंत शासनाने शिफारस यादीतील श्री.राठोर यांचे नाव वगळू नये असे आदेश दिले होते. यास्तव जात वैधता प्रमाणपत्राबाबत निर्णय होईपर्यंत श्री.राठोर यांच्या नियुक्ती प्रक्रियेला स्थगिती देण्यात आली होती. विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, औरंगाबाद यांनी श्री.राठोर यांचे जात वैधता प्रमाणपत्र दि. २७.०५.२०११ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर केले.

सदर वैधता प्रमाणपत्रात श्री.राठोर यांचे आडनांव राठोड असे नमूद करण्यात आले होते. याबाबत समितीचे अभिप्राय घेण्यात आले असता समितीने राठोड व राठोर नांवाची व्यक्ती एकच असल्याचे अभिप्राय दिले व त्यानंतर याबाबत विधी व न्याय विभागाच्या अभिप्रायानुसार श्री.आशुतोष राठोर यांना शासन निर्णय क्र.नियुक्ती-२०११/(१००/२०११)/आ (संनि), दि.२१.०७.२०१२ अन्वये नियुक्ती देण्यात आली आहे. त्यामुळे नव्याने चौकशी करण्याची आवश्यकता नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोंदिया जिल्हयामध्ये बीपीएल यादीचे सर्व्हेक्षण करण्याबाबत**

**(९) ४१९७ (२२-१२-२०१४). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हयामध्ये गेल्या १५ वर्षापासून बीपीएल यादीचे सर्व्हेक्षण करण्यात आलेले नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे अनेक कुटूंब सदर योजनेपासून वंचित राहिले असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गेल्या १५ वर्षापासून करण्यात न आलेल्या बीपीएल यादीचे सर्व्हेक्षण तातडीने करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०३-२०१५) :**(१), (२) व (३) नाही.

केंद्र शासनाच्या निर्देशानुसार राज्यातील दारिद्र रेषेखालील कुटूंबे निश्चित करण्याकरीता राज्यात दारिद्र रेषेखालील कुटूंब गणना २००२ करण्यात आली असून पात्र कुटूंबाना विविध योजनांचा लाभ देण्यात येत आहे.

दरम्यान केंद्र शासनाच्या मार्गदर्शन सूचनेनुसार राज्यातील दारिद्र रेषेखालील कुटूंबे निश्चित करण्याकरीता राज्यात सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण २०११ करण्यात येत आहे. सदरील प्रक्रियेतील प्रत्यक्ष सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाले असून प्रारुप यादी प्रसिध्द सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाले असून प्ररुप यादी प्रसिध्द करणे, दावे व आक्षेप निकालात काढणे इतयादी प्रक्रिया सुरु

करण्यात येत आहे. सदरील प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सर्वेक्षणाची परिपूर्ण माहिती केंद्र शासनास सादर करण्यात येणार असून त्यानंतर केंद्र शासनाकडून राज्यातील दारिद्र रेषेखालील कुटूंबांचे निश्चितीकरण होणार आहे.

---

**मारेगाव (जि.यवतमाळ) तालुक्यात सिंचनाची सुविधा उपलब्ध नसल्याबाबत**

**(१०) ४८२६ (१५-०१-२०१५). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मारेगाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील मारेगांव, मार्डी, करणवाडी, कुंभा, आदी गावांसह संपूर्ण तालुक्यात सिंचनाची सुविधा उपलब्ध नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तालुक्यातील बेंबळा सिंचन प्रकल्पाच्या कालव्यांची कामे अपूर्ण आहे तसेच ज्यांच्या शेतातून कालवे गेले आहेत त्यांना आर्थिक सवलतीचा लाभ मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०७-०३-२०१५) :**(१) नाही.

बेंबळा प्रकल्पाद्वारे मारेगांव तालुक्यातील २९ गावे व नवरगांव मध्यम व ७ लघु प्रकल्पाद्वारे मारेगाव तालुक्यास सिंचन सुविधा उपलब्ध होत आहे.

(२) बेंबळा प्रकल्पाचा कालवा बांधकामाधीन असून मारेगाव तालुक्यातील ३०९.२५ हे एवढया जमीनीपैकी ९७.२५ हे जमिनीचा रु. २.४१ कोटी मोबदला संबंधितास अदा केलेला आहे.

(३) व (४) उर्वरित क्षेत्र २१२.५८ हे अधिग्रहणाचे प्रस्तावावर महसूल विभागाची कार्यवाही सुरु आहे.

---

**पेण तालुक्यातील हेटवणे मध्यम प्रकल्पातील पाण्याच्या विसर्गासाठी आणण्यात आलेले पाईप पडून असल्याबाबत**

**(११) ५२३३ (०७-०४-२०१५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण तालुक्यातील हेटवणे मध्यम प्रकल्पातील पाण्याच्या विसर्गासाठी आणण्यात आलेले पाईप गेल्या ९ वर्षापासुन पडून आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पाचे पाईप टाकण्यासाठी भाडेपट्टयाने घेतलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनीचा मोबदला त्यांना देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, अलिबाग, पेण व रोहा परिसरातील प्रलंबित काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२८-०७-२०१५) :**(१) होय.

(२) सन २०१० पर्यंत ठेकेदारामार्फत शेतकऱ्याला भाडेपट्टाने घेतलेल्या जमिनीचा अंशत: मोबदला देण्यात आला आहे. तसेच शेतकरी व ठेकेदार यांच्यातील भाडेपट्टयाच्या करारानुसार ऑगस्ट २०१० ते मार्च २०१५ या कालावधीसाठी थकीत भुभाडे रु.१,४७,५००/- ठेकेदाराच्या सुरक्षा अनामत रक्कमेतुन देण्यात येत आहे.

(३) नविन भुसंपादन कायद्यानुसार उर्वरित कालव्याची भुसंपादन प्रक्रिया पुर्ण करुन निधीच्या उपलब्धतेनुसार प्रकल्प पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

**हिंगोली जिल्हयातील शेनोडी-रामवाडी उपसा सिंचन योजना प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता मिळण्याबाबत**

**(१२) ५६२९ (०७-०४-२०१५). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयातील आदिवासी अल्पभूधारक व कोरडवाहू शेतक-यांना वरदान ठरणा-या ईसापूर धरणातून शेनोडी-रामवाडी उपसा सिंचन योजना प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक २९ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात सहाय्यक मुख्य प्रशासक गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विस्तार महामंडळ यांनी मा.कार्यकारी संचालक गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ औरंगाबाद यांना दिनांक २९ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२८-०७-२०१५) :**(१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) प्रस्तावित शेनोडी-रामवाडी उपसा सिंचन योजनेचा प्रस्ताव महामंडळस्तरावर तपाणीधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जलसंपदा विभागाची निधी अभावी प्रलंबित असलेली ११०० कोटीहून अधिक रूपयांची कामे आदेश देण्यात आल्याबाबत**

**(१३) ५९९३ (०७-०४-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलसंपदा विभागाची निधी अभावी प्रलंबित असलेली ११०० कोटीहून अधिक रूपयांची काम थांबविण्याचे शासनाने माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान आदेश दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर काम न थांबविण्यासाठी मा.मंत्री, जलसंपदा विभाग यांना कंत्राटदारांनी १०० कोटी रूपयांची लाच देवू केल्याची बाब दिनांक २७ डिसेंबर, २०१४ रोजी निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी विविध राजकीय पक्षांनी तक्रारी दाखल केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२७-०७-२०१५) :**(१) नाही,

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**स्वयंचलीत हवामान केंद्र त्वरीत स्थापन करण्याबाबत**

**(१४) ६६९२ (१०-०४-२०१५). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई व ठाणे परिसरात अतिवृष्टी व नद्यांना आलेल्या पुरामुळे झालेले नुकसान लक्षात घेवून शासनाने नेमलेल्या डॉ.माधवराव चितळे समितीने शिफारस केल्याप्रमाणे स्वयंचलीत हवामान केंद्र स्थापन करण्याबाबत शासनाने कोणतीही कार्यवाही केली नाही असे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वयंचलीत हवामान केंद्र त्वरीत स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-०७-२०१५) :**(१) होय.

दिनांक २७ मे, २००८ चा शासन निर्णय क्र. जविप्र २००८/५/(४७/०८)/०८/जसंनि अन्वये जलविज्ञान प्रकल्पांतर्गत मुंबई शहर व उपनगरात पर्जन्यमान व हवामान केंद्र करण्यासाठी जलपविज्ञान प्रकल्पाचा उपविभाग सुरु करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली नाही.

(२) उपरोक्त शासन निर्णयानुसार स्वयंचलीत हवामान केंद्र करण्याची कार्यवाही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत प्रगतीत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**७० हजार कोटी रुपयाचा सिंचन गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(१५) ७४०८ (०७-०४-२०१५). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तत्कालीन शासनाच्या १५ वर्षाच्या राजवटीत सिंचन प्रकल्पावर झालेल्या खर्चात सुमारे ७० हजार कोटी रुपयाचा सिंचन गैरव्यवहार झाल्याने शासनाने नियुक्त केलेल्या चितळे समितीच्या अहवालात नमूद केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्याबाबतची परवानगी लाचलुचपत विभागाने शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने चौकशी करण्याची परवानगी दिली आहे काय व त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,
(४) अद्याप चौकशीसाठी शासनाने परवानगी दिली नसल्यास, त्यांची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२८-०७-२०१५) :**(१) नाही,
(२) होय, पाटबंधारे विकास महामंडळाच्या अखत्यारीतील पाटबंधारे प्रकल्पास मंजूरी देताना झालेल्या गैरप्रकाराची उघड चौकशी करण्याबाबतचा प्रस्ताव लाचलुचपत विभागाने शासनास (गृह विभागाकडे) सादर केला होता,
(३) होय, प्रस्तुत प्रकरणी उघड चौकशी करण्यास शासनाने परवानगी दिली आहे. त्यानुषंगाने पुढील चौकशी सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रायगड जिल्हयातील पाटबंधारे योजना कार्यान्वित होण्यासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत**

**(१६) ७६९२ (०७-०४-२०१५). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्हयातील भिरा, मोर्बा, कोडांणे, बाळगंगा इत्यादी २५ पाटबंधारे प्रकल्प प्रस्तावित असून पैकी काही प्रकल्पांची प्रक्रिया पूर्ण झाली असून अद्याप कामाला सुरुवात झाली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रायगड जिल्हयातील दुबार पिकासाठी व टंचाईग्रस्त गावांना पिण्याचे पाणी उपलब्ध होण्याच्या दृष्टिने सदर प्रकल्प सुरु करण्याच्या दृष्टिने निधी उपलब्ध करणार आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त धरणा अंतर्गत येणाऱ्या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टिने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२८-०७-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.

रायगड जिल्ह्यात २५ पाटबंधारे प्रकल्प नसून २३ प्रकल्प आहेत, यापैकी भिरा जलविद्युत प्रकल्प, मोर्बा लपा प्रकल्प हे २ प्रकल्प पूर्ण झालेले आहेत.

कोंडाणे, वडशेतवावे, अंबोली, कोथेरी, नागेश्वरी, पालीभुतावली, काळवली-धारवली, पन्हाळघर हे ल.पा. प्रकल्प, हरीहरेश्वर पर्यटन विभाग पाणीपुरवठा प्रकल्प, बाळंगगा पाणीपुरवठा प्रकल्प, काळ जलविद्युत प्रकल्प, कुंभे जलविद्युत प्रकल्प हेटवणे मध्यम प्रकल्प या १३ प्रकल्पांची कामे प्रगतीपथावर आहेत, चणेरा व बामणपाडा लघु पाटबंधारे योजना व सांबरकुंड मध्यम प्रकल्प या ३ प्रकल्पांच्या कामास अद्याप सुरुवात झालेली नाही, तसेच वांदे लघु पाटबंधारे योजना, ता.मुरुड नांदगांव लघु पाटबंधारे योजना, ता.कर्जत, पोशिर प्रकल्प ता.कर्जत, शिलार प्रकल्प, ता.कर्जत, सालपे मध्यम प्रकल्प, ता.कर्जत अशा एकूण ५ योजना रायगड जिल्ह्यातील प्रस्तावित योजना आहेत, तथापि, या प्रकल्पांना अद्याप प्रशासकीय मान्यता मिळालेली नाही.

(२) राज्याच्या आर्थोपाय स्थितीनुसार व मा.राज्यपालांच्या निदेशानुसार बांधकामाधिन प्रकल्पांस निधी उपलब्ध करण्यात येतो, सद्य:स्थितीत नवीन प्रकल्पास प्रशासकीय मान्यता न देण्याचे मा.राज्यपाल महोदयांचे निर्देश आहेत.

(३) प्रकल्पांर्गत प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याची प्रक्रिया प्रगतीत आहे.

---

**मौजे हातवन (जि.जालना) बृ.ल.पा.प्रकल्पाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(१७) ७८१२ (०८-०७-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (धनसावंगी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे हातवन (जि.जालना) बृ.ल.पा.प्रकल्पाचे काम अपूर्णावस्थेत असल्यामुळे अनेक वर्षापासून नागरिकांना पाणी टंचाईला सामना करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त काम तातडीने हाती घेऊन भूसंपादन शीघ्रतेने होण्याकरिता सन २००६ चा कायद्याप्रमाणे सरळखरेदीने भुसंपादनास मान्यता देण्याबाबत तसेच सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात कमीत कमी ५० कोटी निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त काम किती कालावधीत पूर्ण होण्याचे अपेक्षित आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२८-०७-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे, हातवन बृ.ल.पा. प्रकल्पाचे काम भूसंपादन अभावी अपूर्ण आहे.

(२) सन २००६ च्या शासन निर्णयानुसार महामंडळ नियामक मंडळाच्या ४५ व ४९ व्या बैठकीस सरळ खरेदी प्रस्तावास मान्यता घेण्यात आली, तथापि शेतकऱ्यांनी सदर दर मान्य केले नाही, शासन निर्णय १२ मे, २०१५ अन्वये सरळ खरेदीची कार्यवाही करणेत येईल, सन २०१५-१६ साठी ३.०० कोटी अनुदान मजुर आहे.

(३) भूसंपादन पुनर्वसनाची कार्यवाही प्रलंबीत आहे.
(४) भूसंपादन व पुनर्वसनाची कामे पूर्ण करुन निधीचे उपलब्धतेनुसार प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

**पेण (जि.रायगड) तालुक्यातील सेझ प्रकल्प रद्द होवूनही हेटवणे धरणाच्या लाभ क्षेत्रातील गावांमध्ये अद्यापही कालव्यांची कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(१८) ८१५३ (०७-०४-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) तालुक्यातील सेझ प्रकल्प रद्द होवूनही हेटवणे धरणाच्या लाभ क्षेत्रातील गावांमध्ये अद्यापही कालव्यांच्या कामांना सुरुवात झाली नसल्यामुळे गेल्या १४ वर्षात या भागातील शेतीला पाणी न मिळू शकल्याने शेतकरी दुबार पिके घेण्यापासून वंचित राहीलाचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तालुक्यातील ५२ गावांना पिण्यासाठी व शेतीसाठी धरणात पाणी उपलब्ध व्हावे म्हणून ३२९.९० कोटी रुपयांचा प्रकल्पाला खर्च मंजूर करण्यात आला असून कालव्यासाठीचे पाईप गेली ८ ते ९ वर्षे शेतातच पडून आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कालव्याचे काम पूर्ण न झाल्यामुळे व शेतीला पाणी न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कालव्याचे काम पूर्ण होण्यासाठी व शेतक-यांची झालेली नुकसान भरपाई मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२८-०७-२०१५) :**(१) प्रकल्पाच्या संयुक्त कालवा कि.मी. १ ते ११ मधील मातीकामे व पारेषणकामे, अस्तरीकरणाचे कामासह पूर्ण झालेली आहेत,
डावा तीर कालवा कि.मी १३ ते २२ मधील काही किरकोळ कामे वगळता कालव्याचे मातीकाम व पारेषणकामे पूर्ण झाली आहेत.
उजवातीर कालवा कि.मी ११ ते २० मधील कामे कि.म निहाय वेगवेगळया अभिकरणामार्फत प्रगतीपथावर आहेत, तथापी संबंधित शेतकऱ्यांचा भूसंपादनास तीव्र विरोध असल्यामुळे पुढील कामे पूर्ण होऊ शकली नाहीत,
(२) प्रकल्पाची सुधारीत प्रशासकीय मान्यतेची किंमत रु. ३२९.९० कोटी इतकी असून प्रकल्पावर मार्च २०१५ अखेर रु. ३००.१२ कोटी इतका खर्च झालेला असून त्यातून धरणाचे काम पूर्ण झालेले आहे व कालव्याची २१% कामे पुर्ण झाली आहेत,
शिर्की वितरीकेची कामे आर.सी.सी व पी.व्ही.सी. पाईप लाईनदव्दारे करणे प्रस्तावित आहे, तथापि भूसंपादनाच्या विरोधामुळे कालवा कामे बंद आहेत,
(३) नाही.

आज अखेर प्रकल्पावर ११२४ हे क्षेत्रावर सिंचन निर्मिती झाली असून १८५ हे क्षेत्रावर प्रत्यक्ष सिंचन होत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) वितरकेच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांची उघडया कालव्याच्या भुसंपादनास तीव्र विरोध असल्यामुळे त्याठिकाणी बंद पाईपमधून कालवे प्रस्तावित केले, परंतु शेतकऱ्यांनी त्यासाठी आवश्यक भूसंपादनास विरोध केल्यामुळे वितरण व्यवस्थेची कामे करता आली नाहीत. नवीन भू संपादन कायद्यानुसार भूसंपादन पूर्ण झाल्यानंतर सदर कामे निधीच्या उपलब्धतेनुसार पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

**पिळकोस (ता.कळवण जि.नाशिक) येथे सुळे डावा कालवा व पोटचारी क्र.२ च्या कामामुळे रस्ता बंद झाल्याबाबत**

**(१९) ९१८८ (०७-०४-२०१५). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिळकोस, (ता.कळवण जि.नाशिक) येथे सुळे डावा कालवा व पोटचारी क्र.२ च्या कामामुळे येथील काही शेतकज्यांचा हक्काचा वहीवाटीचा रस्ता बंद झाल्याने शेतक-यांची गैरसोय होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्याबाबत ल.पा.विभागाकडे अनेकवेळा शेतक-यांनी तक्रारी करुन देखील संबंधित विभागाचे याकडे दुर्लक्ष होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतक-यांच्या मागणीकडे दुर्लक्ष करणा-या संबंधित अधिका-यांवर कारवाई करुन या शेतक-यांना रस्ता उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०७-०९-२०१५) :**(१) होय.

(२) नाही.

शेतकऱ्यांच्या अर्जानुसार विषयांकित रस्ता ओलांडण्याच्या ठिकाणी सायफन प्रस्तावित केले आहे, सदर कामाच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता दिली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्हयातील काजिर्डा (राजापूर) गावातील जामदा नदीवर बांधण्यात येणारा मध्यम पाटबंधारे प्रकल्प रद्द करण्याबाबत**

**(२०) ९३६५ (०७-०४-२०१५). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील काजिर्डा (राजापूर) गावातील जामदा नदीवर बांधण्यात येणारा मध्यम पाटबंधारे प्रकल्प रद्द करावा तसेच काजिर्डा राणेवाडी या बुडीत क्षेत्रातील ग्रामस्थांची

सुनावणी घ्यावी अशी आग्रही मागणी धर्मराज शेतकरी संघटनेने जिल्हा प्रशासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीसंदर्भातील शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२८-०७-२०१५)** :(१) धर्मराज शेतकरी संघटनेने दि.२३/१२/२०१४ चे मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्याकडे सादर केले आहे, सदरचे निवेदन कार्यकारी अभियंता लघु पाटबंधारे विभाग, चिपळूण यांना जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी दि.१०/०४/२०१५ रोजी पाठविले आहे,
(२) निवेदनातील मुद्याबाबतची पडताळणी क्षेत्रीय स्तरावर चालू असून त्यांच्या पुर्ततेची कार्यवाही शासनाच्या पुनर्वसनाच्या व भूसंपादनाच्या धोरणानुसार आणि जिल्हा पुनर्वसन अधिकारी/ जिल्हा भूसंपादन अधिकारी यांच्या सहकार्याने तसेच उपलब्ध निधीनुसार करण्याचे नियोजन करण्यात येत आहे,
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मनरामखेड (ता.माहूर, जि.नांदेड) येथील प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(२१) ९८२१ (०७-०४-२०१५). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मनरामखेड (ता.माहूर, जि.नांदेड) येथील मनिराम थड प्रकल्पाचे काम जवळपास ९२ टक्के पूर्ण होऊनसुध्दा अद्यापपर्यंत तेथील गावांचे पुनर्वसन न झाल्याचे माहे जानेवारी, २०१५ वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) सदर बृहत लघुपाटबंधारे प्रकल्पाचा तेथील जनतेस फायदा न झाल्याने तेथील जनतेमध्ये असंतोष पसरलेला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, अद्यापपर्यंत पुनर्वसन न झालेल्या प्रकल्पबाधितांसाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना करणार आहे,
(४) अद्यापपर्यंत पुनर्वसन न होण्याची कारणे काय आहेत व त्याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२८-०७-२०१५)** :(१) होय,
(२) हे खरे नाही,
(३) पुनर्वसन करावयाच्या गावठाणाची भुसंपादन प्रक्रिया प्रगतीत आहे, भुसंपादन प्रक्रिया पुर्ण होताच पुनर्वसनाचे कामास सुरुवात करण्यात येईल,
(४) मौ. वायफणी गावाच्या नवीन गावठाणासाठी १२.९६ हे. भुसंपादन प्रस्तावास बाधीत लोकांचा विरोध होता, जवळपास २ वर्ष जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडे भूसंपादन प्रकरणात

प्रकल्प यंत्रणा व बाधीत लोका समक्ष सुनावणीची प्रक्रिया चालु होती, सदर प्रकरणात आता लोकांनी जमिन देण्याची सहमती दर्शविली असुन मावेजा वाटप करण्याची अंतिम प्रक्रिया महसूल विभागाकडून प्रगतीपथावर आहे.

---

**निम्न तेरणा प्रकल्प ,माकणी (ता.लोहारा, जि.उस्मानाबाद) येथील निम्न तेरणा उजवा कालव्यावरील पेठसांगवी, एकोंडी व कवठा येथे पुल बांधण्याबाबत**

**(२२) ९९५५ (०७-०४-२०१४). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निम्न तेरणा प्रकल्प , माकणी (ता.लोहारा, जि.उस्मानाबाद) येथील निम्न तेरणा उजवा कालव्यावरील पेठसांगवी, एकोंडी व कवठा येथे अनुक्रमे कि.मी. १८, २२ व २५ या अंतरावर आवश्यक तेथे पुल बांधणेबाबत उमरगा लोहारा येथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कार्यकारी अभियंता, निम्न तेरणा कालवा विभाग क्र. २ लातूर यांना दिनांक १ एप्रिल, २०१३ रोजी लेखी पत्राद्वारे सुचित केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने संबंधितादवारे कोणतीच कार्यवाही न झालेल्या कारणाने परिसरातील नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२८-०७-२०१५) :**(१) होय.

(२) व (३) उक्त निवेदनाच्या अनुषंगाने निम्न तेरणा उजव्या कालव्यावरील सा.क्र. १८०१३ मी. वरील पूलाच्या बांधकामाला दि. २२/०४/२०१५ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले असून बांधकाम प्रगती पथावर आहे.

तसेच सा.क्र. २२२७० सी. व सा.क्र. २४३९८ मी. वरील पुलाच्या बांधकामाच्या अंदाजपत्रकास मान्यता मिळाली असून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**नवीन भुसंपादन कायदा २०१३ कायद्याच्या अंमलबजावणीबाबत**

**(२३) १०४८३ (०७-०४-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवीन भुसंपादन कायदा २०१३ लागु करण्याबाबत कायद्याच्या अंमलबजावणी वर संभ्रम निर्माण झाला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती जिल्हयातील सिंचन प्रकल्प मोठ्या प्रमाणात प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर सिंचन प्रलंबित असल्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास,याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२८-०७-२०१५) :**(१) नाही,
(२), (३), (४) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर अंतर्गत अमरावती जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पाचे प्रस्ताव मुख्यत्वे वनजमीन भूसंपादन, खाजगी जमीन भूसंपादन व सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या कार्यवाहीत आहेत.

उपरोक्त कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर प्रकल्प पूर्ण करण्याबाबत नियोजन आहे.

---

**औसा (जि.लातूर) तालुक्यातील आंदोरा येथील सिंचन विहिरीबाबत**

**(२४) १०९३० (०८-०४-२०१५). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औसा तालुक्यातील (जि.लातूर) आंदोरा येथील अनेक शेतक-यांची सन २०१२ मध्ये सिंचन विहिरीसाठी महाराष्ट्र ग्रामीण रोहयोकडे प्रस्ताव सादर केल्यानंतर त्यापैकी २३ शेतक-यांना सिंचन विहिरी मंजूर झाल्या व त्यासंदर्भातील प्रशासकीय आदेश दिनांक ३० डिसेंबर, २०१२ रोजी औसा पंचायत समितीमार्फत देण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू २३ शेतक-यांना मग्रारोहयो अंतर्गत सिंचन विहीरी मंजूर झाल्या तरीही गेल्या २ वर्षापासून विहीरीचे काम सुरु करण्यासाठी कार्यारंभ आदेश मिळाले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कार्यारंभ आदेश देण्यास विलंब होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) सदरहू शेतक-यांना मग्रारोहयो अंतर्गत मंजूर झालेल्या सिंचन विहिरीचे काम विनाविलंब सुरु होवून लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-०६-२०१५) :**(१) मौ.आंदोरा ता.औसा येथील सन २०१२-१३ मध्ये २३ सिंचन विहिरींच्या कामांना गट विकास अधिकारी पंचायत समिती, औसा यांनी दिनांक ३० मे, २०१४ च्या आदेशान्वये प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.
(२) अद्याप कार्यारंभ आदेश देण्यात आलेले नाहीत.
(३) कार्यारंभ आदेश न देण्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत-
१. प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर पावसाळी हंगाम सुरु झाला.
२. सन २०१३-१४ मध्ये सिंचन विहिरीचे काम चालु करण्यासाठी मजुरांची कामाची मागणी नव्हती.
३. शासन निर्णय दिनांक १७ डिसेंबर, २०१२ नुसार सिंचन विहिरींच्या कामांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचा ग्रामसभेचा ठराव दिनांक १६ फेब्रुवारी, २०१५ रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती औसा यांना सादर करण्यात आला.
(४) शासन निर्णय दिनांक १७ डिसेंबर, २०१२ अन्वये सदर विहिरींना नव्याने सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**ई-पंचायत, ई-पीआयआर प्रकल्प बंद करण्यात येणार असल्याबाबत**

**(२५) ११५७४ (०८-०४-२०१५). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) १३ व्या वित्त आयोगाच्या निधीमधुन जिल्हा परीषद पंचायत समिती व ग्राम पंचायत यांना ई-पंचायत व ई-पीआयआर प्रकल्पासाठी संगणक व इतर सामुग्री उपलब्ध करुन देण्यात आली होती हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील किती ग्राम पंचायतींना संगणकाची उपलब्धता करुन देण्यात आली आहे,

(३) असल्यास, सद्यस्थितीत हे संगणक कुशल मनुष्यबळ, इंटरनेट व देखभाल दुरुस्ती च्या सुविधेअभावी पडून आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्य शासनाचा ई-पंचायत व ई-पीआयआर हा प्रकल्प बंद करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) नसल्यास, यासंदर्भात शासनाने कोणकोणत्या उपाययोजना केल्या आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०५-२०१५) :**(१) होय.

(२) राज्यातील सर्व २८,०१२ ग्रामपंचायतीकडे सद्य:स्थितीला ई-पंचायत, बी.आर.जी.एफ. अथवा स्वनिधीतून खरेदी केलेले संगणक उपलब्ध आहेत.

(३) नाही.

(४) नाही.

(५) ई-पंचायत प्रकल्प हा सद्य:स्थितीत सुरु आहे. त्यात वेळोवेळी कालानुरुप सुधारणा करण्यात येत आहे.

---

**उस्मानाबाद जिल्ह्यातील भूम व वाशी तालुक्यात मांजरा नदीवरील कोल्हापूरी बंधा-याच्या ठिकाणी बॅरेज बांधण्याबाबत**

**(२६) १३१२२ (०८-०४-२०१५). श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यातील भूम व वाशी तालुक्यात मांजरा नदीवरील कोल्हापूरी बंधा-याच्या ठिकाणी बॅरेज बांधण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विचाराधीन प्रस्तावावर अंतिम निर्णय झाला आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-०७-२०१५) :**(१) नाही.

(२) नाही.

(३) मा.मंत्री (जलसंपदा) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३१.०५, २०११ रोजी झालेल्या बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार उपरोक्त प्रकरणी क्षेत्रिय स्तरावर पुढील उचित कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तालुका बाभुळगांव येथील रोजगार हमी योजनेच्या कामात गैरप्रकार झाल्याबाबत**

**(२७) १३७४५ (०८-०४-२०१५). श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तालुका बाभुळगांव येथील चिमना-बागापूर ग्रा.पं. अंतर्गत करण्यात आलेल्या रोजगार हमी योजना कामावार मयत मजूराची नावे दाखवून लाखो रुपयांचा गैरप्रकार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रोजगार हमी योजनाच्या कामात मयत नामदेव महादेव किनारे यांना कामावर दाखवून ग्रामपंचायतने कामाचे हजेरीपट भरले असल्याचा आरोप नातवाने केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, २२० रुपयाप्रमाणे तीन हजार ९६० रुपये मजूरीच्या स्वरुपात पं.स.बाभुळगांव यांनी पोस्ट ऑफीस करळगाव येथे जमा करुन त्याची उचलही केली .याबाबत नातू प्रशांत शंकर किनाके याने तक्रार जिल्हाधिकारी यांच्याकडे केली असता कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०४-०९-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२) मयत श्री.नामदेव महादेव किनाके यांचे नातवाने आरोप केला आहे.
(३) व (४) या प्रकरणी चौकशी केली असता मयत श्री.नामदेव महादेव किनाके याचे नाव हजेरी पटलावर नसल्याने त्यांचे नावे पोष्ट ऑफीसमध्ये मजूरीची रक्कम जमा केलेली नाही.

---

**बांभुळगाव तालुक्यातील (जि.यवतमाळ) वर्धा येथील बॅरेजचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(२८) १३८०३ (०८-०४-२०१५). प्रा.अशोक उईके (राळेगाव), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बांभुळगाव तालुक्यातील (जि.यवतमाळ) वर्धा येथील बॅरेजचे काम अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बॅरेजच्या लाभ क्षेत्रात ३.२३ हे कमाल धारण क्षेत्र शासनाच्या परिपत्रकानुसार ठरविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरील परिपत्रकानुसार लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांना अडचणी निर्माण होत असून यामध्ये शासन काही सुधारणा करणार आहे काय,
(४) नसल्यास, सदर काम कधीपर्यंत पूर्णत्वास नेणार आहे,
(५) असल्यास, लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या अडचणी दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२८-०७-२०१५)** :(१) होय, सद्य:स्थितीत ४० टक्के काम झालेले आहे.
(२) लाभक्षेत्रातील कमाल धारण क्षेत्र महाराष्ट्र प्रकल्प बाधीत व्यक्तीचे पुनर्वसन अधिनियम १९९९ नुसार ठरविण्यात आले आहे.
(३) सदर तरतूद अधिनियमातील तरतूदीनुसार आहे, अधिनियमात बदल करण्याची बाब सध्या प्रस्तावित नाही.
(४) प्रकल्पाचे काम जून, २०१८ पर्यत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न ३ मधील उत्तराप्रमाणे.

---

**सावली (जि.चंद्रपूर) तालुक्यातील वाघोली बुटी उपसा सिंचन योजनेसाठी संपादीत केलेल्या जमीनीचा मोबदला शेतकऱ्यांना मिळण्याबाबत**

**(२९) १४२५० (०८-०४-२०१५). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यातील सावली तालुकयातील वाघोली बुटी उपसा सिंचन योजनेच्या नहरासाठी निलासनी पेठगांव परिसरातील शेतक-यांच्या शेकडो एकर जमिनी सात वर्षापूर्व संपादीत केले असतांना सुध्दा अद्यापही त्यांना नुकसान भरपाई मिळालेली नसल्याची माहिती दिनांक १० फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निर्देशनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या शेतकऱ्यांच्या जमिनी भुसंपादीत करण्यात आले आहे अशा शेतक-यांना त्यांना त्यांच्या शेतीचा मोबदला देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२८-०७-२०१५)** :(१) व (२) कालव्यांच्या बांधकामासाठी १८.०८ हेक्टर्स जमीन अधिग्रहीत करण्यात आलेली आहे, त्याबाबत शासन निर्णय महसूल व वन विभाग दि. १२.५.२०१५ नुसार सरळ खरेदीने भूसंपादनाची कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पेंच प्रकल्पाचे पाणी मोहाडी (जि.भंडारा) तालुक्याअंतर्गत बेठेकर-बोथली लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांना देण्यासाठीचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत**

**(३०) १४२६४ (०८-०४-२०१५). श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पेंच प्रकल्पाचे पाणी मोहाडी (जि.भंडारा) तालुक्याअंतर्गत बेठेकर-बोथली लाभ क्षेत्रातील शेतक-यांना देण्यासाठीचा प्रस्ताव प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्ताव प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास,या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२८-०७-२०१५) :**(१) हे अंशत: खरे आहे,
मा. आमदार श्री. चरण वाघमारे यांचे दिनांक ९ डिसेंबर, २०१४ चे निवेदन प्राप्त झालेले आहे, तथापि असा प्रस्ताव मंजूरीकरीता प्रलंबित नाही,
(२) नाही,
(३) प्रादेशिक कार्यालयाने तत्वत: मंजुरी दिलेला प्रस्ताव कास्तकारांनी नाकारलेला आहे,
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोंट्याटोला सिंचन प्रकल्पातून पाण्याचा उपसा बंद असल्यामुळे धान उत्पादकांचे नुकसान होत असल्याबाबत**

**(३१) १४२६६ (०८-०४-२०१५). श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोंट्याटोला सिंचन प्रकल्पातून पाण्याचा उपसा बंद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे धान उत्पादकासमोर सिंचनाचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास,सदर प्रकल्पाच्या देखभाल दुरुस्तीकडे संबंधित विभागाच्या अधिनस्त यंत्रणेचे दुर्लक्ष झाले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अधिकारी व कर्मचा-यांनी टाळाटाळ करुन धान उत्पादक शेतक-यांना त्रास देतात, हे ही खरे आहे काय,
(५) तसेच, याबाबत धान उत्पादक शेतक-यांत नाराजी व असंतोष पसरला, हे ही खरे आहे काय,
(६) तसेच, याबाबत शासनाने कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२८-०७-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.

सोंड्याटोला उपसा सिंचन योजनेद्वारे बावनथडी नदीमधून पाणी उपसा करुन सन २००८ पासून सिंचनासाठी चांदपूर जलाशयात पाणी सोडण्यात येते, चांदपूर हे ब्रिटीशकालीन धरण आहे, चांदपूर जलाशयाच्या अग्रस्थ नियंत्रकात ३ दरवाजे आहेत, खरीप हंगाम २०१४-१५ दरम्यान या ३ दरवाज्यांपैकी द्वार क्रमांक २ व ३ मध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने सिंचनात व्यत्यय आला, तथापि तात्पुरती उपाययोजना करुन खरीप सिंचन सुरळीत पार पाडण्यात आले.

द्वार दुरुस्ती अत्यावश्यक असल्याने दुरुस्तीकरीता उन्हाळी हंगाम न घेण्याचे ठरले, तसेच चांदपूर प्रकल्पाच्या लाभधाराकांना तसे सुचित करण्यात आले, त्यानुसार ऑक्टोबर २०१४ पासून सोंड्याटोला उपसा सिंचन योजनेमधून चांदपूर जलाशयात पाणी भरणा बंद करण्यात आला होता,

(२) नाही, खरीप हंगामा २०१४-१५ साठी आवश्यक असलेले २० दशलक्ष घ.मी. पाणी चांदपूर जलाशयात (ऑक्टोबर २०१४ पर्यंत उपसा करुन) उपलब्ध असल्याने खरीप हंगाम प्रभावित झालेले नाही.

चांदपूर जलाशयाच्या द्वार क्र.२ व ३ ची दुरुस्ती मार्च, २०१५ अखेर पूर्ण करण्यात आली असून या पुढील सिंचन सुरळीत होईल, खरीप सिंचन ७७६७.६० हेक्टर करण्यात आले आहे.

(३) सिंचनातील व्यत्यय हा चांदपूर तलावाच्या अग्रस्थ नियंत्रकाच्या द्वारातील तांत्रिक बिघाडामुळे आला होता, दुरुस्ती पुर्ण करण्यात आली आहे, देखभाल दुरुस्तीकडे दुर्लक्ष करण्यात आलेले नाही.

(४) चांदपूर प्रकल्पातील पाणी उपलब्धतेनुसार सिंचनाचा कार्यक्रम यशस्विरित्या राबविण्यात येत आहे, त्यामुळे शेतकऱ्यांना त्रास देण्याचा प्रश्न उद्‍भवत नाही.

(५) नाही.

(६) नाही.

चांदपूर जलाशयाच्या अग्रस्थ नियंत्रकातील द्वार क्रमांक २ व ३ ची दुरुस्ती मार्च, २०१५ अखरे पूर्ण करण्यात आली आहे.

(७) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**जन्म-मृत्यू नोंदी विहित वेळेत न केल्यास एका वर्षानंतर दाखला घेण्यासाठी न्यायिक दंडाधिकारी किंवा महानगर दंडाधिकारी यांचे आदेश ग्राह्य धरण्यात आल्याबाबत**

**(३२) १५५०९ (०९-०४-२०१५). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्यामध्ये जन्म आणि मृत्यू यांची नोंद ग्रामपंचायतीमध्ये करण्यात येते एखाद्या व्यक्तीने एका वर्षानंतरही ग्रामपंचायतीमध्ये नोंद न केल्यास तहसिलदार यांचेकडे अधिकार आहेत. परंतु आता एका वर्षापेक्षा अधिक कालावधीमध्ये जन्म -मृत्यू याची नोंद नसल्यास जन्म-मृत्यूचा दाखला मिळविण्याकरिता थेट प्रथम वर्ग न्यायिक दंडाधिकारी किंवा

महानगर दंडाधिकारी यांचे आदेश ग्राहय धरण्यात येणार आहेत असे दिनांक १७ डिसेंबर, २०१३ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे व सदर आदेश शासन बदलणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-१०-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) क्रिमिनल पी.आय.एल. क्र.४/२०१३ मध्ये मा.मुंबई उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी दि.१७.१२.२०१३ रोजी दिलेल्या निकालास अनुसरुन विधी व न्याय विभागाच्या दि.३१ डिसेंबर, २०१३ च्या परिपत्रका अन्वये ज्या जन्मू-मृत्यू घटनांची नोंदणी घटना घडल्यापासून एक वर्षाच्या आत झाली नसेल, अशा घटनांच्या नोंदणीसाठी फक्त प्रथमवर्ग न्यायिक दंडाधिकारी किंवा महानगर दंडाधिकारी यांचेच आदेश ग्राहय धरण्यात यावेत असे कळविण्यात आले आहे. त्यानुसार राज्यात सर्वत्र कार्यवाही करण्यात येत आहे.

---

### धुळे जिल्हयातील ग्रामपंचायतीकडून पाणी पट्टी, घरपट्टी व इतर कर वसुली करण्याबाबत

**(३३) १६४८७ (१७-०८-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे जिल्हयातील ग्रामपंचायतीकडून वसूल करण्यात येणा-या पाणी पट्टी, घरपट्टी व इतर कर यांची सरासरी ८० टक्के पर्यंत वसुली करण्यात आली आहे असे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामपंचायतीकडून सदर कर वसुल संपूर्ण १०० टक्के व्हावी याकरीता शासनाने काही महसुली धोरण अवलंबण्याचे ठरविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याचा तपशिल काय आहे,
(४) सदर तपशिल उपलब्ध नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-१०-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १२९ व मुंबई ग्रामपंचायत (येणे असलेल्या रकमा वसुल करण्याबाबत) नियम, १९६० अन्वये कर वसुलीबाबत ग्रामपंचायतींकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## पंचायत समितीच्या ठिकाणी एक नगररचना अधिकारी नेमण्याबाबत

**(३४) १६५५९ (१७-०८-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रादेशिक विकास आराखडा नसलेल्या राज्यातील सुमारे १० हजार ग्रामपंचायतीमध्ये बांधकामाबाबतचे अधिकार गोठवून ते नगररचना विभागाला देण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या उपरोक्त निर्णयानुसार बांधकाम परवानगीसाठी प्रत्येक पंचायत समितीच्या ठिकाणी एक नगररचना अधिकारी नेमण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-१०-२०१५) :**(१) अशी बाब नाही. महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) अधिनियम, २०१४ दि. २९ डिसेंबर, २०१४ मधील कलम २ (१अ) अन्वेय ज्या गावाकरीता प्रारुप प्रादेशिक योजना किंवा अंतिम प्रादेशिक योजना प्रसिध्द करण्यात आलेली नाही अशा गावांमध्ये कोणतीही व्यक्ती, विहित रीतीने पंचायतीचे पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय, कोणतीही इमारत उभारणार नाही अथवा उभारण्यास किंवा पुन्हा उभारण्यास सुरुवात करणार नाही, अशी तरतूद करण्यात आली आहे.

तसेच, कलम २ (२) नुसार पंचायत समिती स्तरावर पदस्थापित केलेल्या, राज्य शासनाच्या नगररचना अधिका-याची किंवा पंचायज समितीच्या स्तरावर असा अधिकारी पदस्थापित करण्यात आलरा नसेल त्याबाबतीत, जिल्हा परिषद स्तरावरील नगररचना अधिका-याची पुर्वपरवानगी घेतल्यानंतरच, पंचायत, या प्रयोजनार्थ केलेल्या अर्जावरुन यथास्थिती, पोट-कलम (१अ) अन्वये कोणतीही परवानगी देईल अशी तरतूद करण्यात आली आहे.

(२) शासन अधिसूचना दिनांक १६ मे, २०१५ अन्वये पंचायत समिती व जिल्हा परिषद येथे नगररचना अधिकरी नियुक्त करणेबाबतची कार्यवाही करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेच्या कामावरील मजुरांचे प्रश्न एकत्रित मांडता यावे याकरिता श्रमिक गट स्थापन करण्याबाबत

**(३५) १६९२९ (१४-०८-२०१५). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेच्या कामावरील मजुरांचे प्रश्न एकत्रित मांडता यावे याकरिता श्रमिक गट स्थापन करण्याच्या सूचना रोजगार हमी आयुक्त

कार्यालयाने दिली असल्याचे माहे मे, २०१५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक जिल्ह्यांनी चक्क दोन मजुरांचाच गट तयार केला तर काही ठिकाणी एकाच जॉबकार्डवरील मजुरांचा गट तयार केल्याने आयुक्तांच्या आदेशाकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-१०-२०१५) :**(१) हे .खरे आहे.

आयुक्त महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना -नागपूर यांनी दिनांक ०४/०२/२०१५ अन्वये श्रमिक गट स्थापन करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

(२) व (३) हे खरे आहे.

सदर बाब निदर्शनास आल्यावर आयुक्त नरेगा यांनी संबंधित यंत्रणांना निकषाप्रमाणे तयार न झालेले लेबर ग्रुप परत तयार करण्याच्या सूचना क्षेत्रिय कार्यालयास दिलेल्या आहेत. तसेच ज्या जिल्ह्यात एकही श्रमिक गट स्थापित करण्यात आलेला नाही त्या जिल्ह्यांनी विहित कार्यपध्दतीप्रमाणे श्रमिक गट तयार करण्याची कार्यवाही करावी अश्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चिखलदरा (जि.अमरावती) तालुक्यात पंतप्रधान ग्रामसडक योजनेचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

**(३६) १७०१७ (१७-०८-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखलदरा (जि.अमरावती) तालुक्यात कोट्यवधी रुपये खर्चून सुरु असलेल्या पंतप्रधान ग्रामसडक योजनेचे काम निकृष्ट दर्जाचे सुरु असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुकयातील काटकुंभ, चुरणी परिसरात पंतप्रधान ग्रामसडक योजनेतर्गत कोट्यवधी रुपयांची रस्त्याची कामे सुरु असून मध्यप्रदेशाच्या भेसदेही येथील एका कंत्राटदारांमार्फत सुरु असलेले काम बंद करण्यात आले तसेच अधिकाऱ्यांसह वन व व्याघ्र प्रकल्पाच्या स्थानिक अधिका-याच्या संगनमताने वृक्षतोड व पाहिजे तेथे खदान खोदून गौण खनिजाची चोरी केली जात असल्याने रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्यामुळे याबाबत दोषींवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०७-१०-२०१५) :**(१) व (२) अशी वस्तुस्थिती नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**साक्री (जि.धुळे) तालुक्यातील बरीच गावे स्वतंत्र महसूल गावे असतांना त्यागावाचा दुस-या ग्रुप ग्रामपंचायतीत समावेश करण्यात आल्याबाबत**

**(३७) १७०८७ (१४-०८-२०१५). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साक्री (जि.धुळे) तालुक्यातील बरीच गावे स्वतंत्र महसूल गांवे असतांना त्यागावाचा दुसऱ्या ग्रुप ग्रामपंचायतीत समावेश आहे उदा. मापलगांवचा मांजरी ग्रुपग्रामपंचायतीत, ओझर्दे गांवाचा कुडाशी ग्रुप ग्रामपंचायतीत, हारपाडा सुकापूर ग्रुपपंचायतीत समावेश करण्यात आले असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पेसा अंतर्गत असलेल्या गावांचा सर्वांगिण विकास होण्यासाठी शासनाने नविन धोरण स्वीकारले असल्याने सर्व महसूल गावांना शासन स्वतंत्र ग्रामपंचायत निर्माण करणार आहे काय,
(३) असल्यास,उपरोक्त प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-१०-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) दिनांक १२ फेब्रुवारी, २००४ च्या शासन निर्णयातील निकषानुसार ग्रामपंचायत विभाजनाबाबतचे प्रस्ताव सादर करणेबाबत संबंधित ग्रामपंचायत विभाजनाबाबतचे प्रस्ताव सादर करणेबाबत संबंधित ग्रामपंचायतींना लेखी पत्रान्वये तसेच, ग्रामसेवक यांच्या मासिक व पाक्षिक सभेत वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत.

स्वतंत्र ग्रामपंचायत निर्माण करणेबतच्या प्राप्त प्रस्तावांवर नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील मलकागुड्डा येथील मदनापूर ते जुन्नापाणी रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत**

**(३८) १७१२१ (१४-०८-२०१५). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकागुड्डा (जि.नांदेड) येथील मदनापूर ते जुन्नापाणी रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे पंतप्रधान ग्राम सडक योजनेंतर्गत १५ कि.मी. अंतर रस्त्यासाठी ५ कोटी ३६ लाख रुपयांचे काम मागील एक वर्षाच्या आधी मंजूर झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे व संथगतीने सुरु असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुषंगाने निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या संबंधित दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-१०-२०१५) :**(१) हे खरे आहे.
(२) सद्यस्थितीत सदर रस्त्याचे काम संथ गतीत सुरु आहे. मात्र कामाचा दर्जा निविदेत नमूद केलेल्या स्पेसिफिकेशननुसार आहे.
(३) व (४) कंत्राटदार सदर काम संथगतीने करत असल्याने कंत्राटदारास रु.१०००/- प्रतिदिन दंड आकारण्यात आला. राज्य गुणवत्ता निरिक्षक यांनी झालेल्या कामाचा दर्जा तपासला असून काम समाधानकारक असल्याचा अभिप्राय दिले आहेत. त्यामुळे कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**बिलोली (जि.नांदेड) तालुक्यात हातपंप दुरुस्तीसाठी आवश्यक साहित्य व मॅकॅनिक उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३९) १७१३३ (२९-०७-२०१५). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बिलोली (जि.नांदेड) तालुक्यातील ९१ गावाकरिता हातपंप दुरुस्तीसाठी केवळ ३ मॅकॅनिक असून बहुतांशी गावांमध्ये पाण्याची पातळी कमी असल्यामुळे व त्यातच हातपंप दुरुस्तीसाठी लागणारे साहित्य गावांच्या प्रमाणात पंचायत समितीकडे उपलब्ध नसल्यामुळे गावकऱ्यांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत असल्याचे माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त तालुक्यात हातपंप दुरुस्तीसाठी आवश्यक साहित्य व मॅकॅनिक उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आह,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०७-१०-२०१५) :**(१) बिलोली तालुक्यातील ७३ ग्रामपंचायतींअतर्गत ८१ गावांमध्ये ५६७ हातपंप कार्यरत आहेत. सदर हातपंपाची दुरुस्ती करण्यासाठी गट विकास अधिकारी, पं.स.बलोली यांचेकडे स्वतंत्र फिरते पथक देण्यात आले आहे. या पथकामध्ये एक वाहन, एक वाहन चालक व हातपंप दुरुस्तीसाठी तीन कर्मचारी नेमण्यात आले आहेत. मार्च, २०१५ मध्ये एकूण ३० गावांमध्ये ५६ हातपंप नादुरुस्त झाल्याच्या तक्रारी गट विकास अधिकारी यांचेकडे प्राप्त झाल्या. या ५६ हातपंपापैकी माहे मार्च, २०१५ मध्ये ४० व माहे एप्रिल, २०१५ मध्ये उर्वरित १६ हातपंपाची दुरुस्ती करुन पाणीपुरवठा चालु करण्यात आला आहे.

(२) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बिलोली यांना हातपंप दुरुस्तीसाठी पुरेसे साहित्य देण्यात आले आहे. गट विकास अधिकारी यांना मागणीनुसार साहित्य उपलब्ध करुन देण्यात येते. हातपंप दुरुस्तीसाठी अतिरिक्त तीन कर्मचारी पं.स. बिलोली येथे उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. तालुकास्तरावरुन हातपंपाचे सुटेभाग खरेदी करुन पथके सतत कार्यरत राहतील यांची दक्षता घेण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी मजूरांच्या हाताला कामे मिळवून देण्याकरिता मनरेगा योजनेंतर्गत कामे सुरु करण्याबाबत**

**(४०) १७१३५ (०३-१०-२०१५). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) किनवट (जि.नांदेड) तालुक्यात मनरेगा योजनेंतर्गत अनेक कामे प्रस्तावित असताना व मजूरांची कामासाठी मागणी असताना एक ही काम पंचायत समितीच्या उदासीन धोरणामुळे सुरु करण्यात आले नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथे दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी मजूरांच्या हाताला कामे मिळवून देण्याकरिता मनरेगा योजनेंतर्गत कामे सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-१०-२०१५) :**(१) हे खरे नाही.

किनवट तालुक्यात मग्रारोहयो अंतर्गत एप्रिल २०१५ मध्ये सरासरी ३६ कामावर ७२५ मजुर उपस्थित होत यावर १८१२५ मनुष्यदिन निर्माण झाले असून मे, २०१५ मध्ये ६३ कामावर ८१४ मजुर उपस्थित होते व त्यावर २०३५० मनुष्यदिन निर्माण झाले आहेत.
(२) शासनाने राज्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेवुन दुष्काळाबाबत करावयाच्या उपाययोजनेबाबत दिनांक २२/०१/२०१५ अन्वये खालीलप्रमाणे सविस्तर सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

कामाची वाढती मागणी लक्षात घेता कामाच्या मागणी पत्रक नमुना क्र.४ पुरेशा प्रमाणात उपलब्ध करुन देणे.

- टंचाईग्रस्त तालुक्यात सर्वेक्षण करुन किती कुटुंबांना कामाची आवश्यकता आहे हे निश्चित करणे.
- प्रत्येक ग्रामपंचायतीमधील अपूर्ण कामांची माहिती,सुरु असलेली कामे,यांचा अभ्यास करुन कामे तातडीने शेल्फवर तयार ठेवणे.
- क्षेत्रिय स्तरावर पुरेसा कंत्राटी कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन देणे.

- राज्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता राज्यात सन २०१५-१६ या वर्षात १.०० लाख विहीर पुनर्भरणाची कामे घेण्याबाबत सविस्तर आदेश दिनांक २७ मे, २०१५ च्या शासन परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात आले आहे.

तसेच दुष्काळग्रस्त परिस्थितीत मजुरांनी कामाची मागणी केल्यावर त्यांना काम उपलब्ध करुन देण्यासाठी १३४२ कामे शेल्फवर ठेवण्यात आली आहेत त्यामुळे मागेल त्याला काम उपलब्ध करुन देण्याची तजवीज आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### दोन महिने बिडीएस प्रणाली बंद असल्याबाबत

**(४१) १७२८५ (१४-०८-२०१५). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १९ लाख कर्मचा-यांना बिडीएस प्रणालीमुळे मार्च महिन्याचे वेतन महिना संपला तरी मिळाला नसल्याचे तसेच मागील दोन महिन्यापासून असाच प्रकार होत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे एप्रिल व मे हे दोन महिने कर्मचा-यासाठी अत्यंत जिकिरीचे असतात मुलांचा शाळेत प्रवेश, त्याचे प्रवेश शुल्क, वह्या-पुस्तके, गणवेश खरेदी करावी लागते या सर्व तसेच इतरही गोष्टीकरीता वेतनाची आवश्यकता असते परंतु या महिन्यातच वेतन मिळत नसल्याने कर्मचा-यांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२२-०९-२०१५) :**(१), (२) व (३) नाही.

ज्या राज्य शासकीय कर्मचाऱ्यांची माहिती सेवार्थ प्रणालीमध्ये नोंद केलेली आहे अशाच कर्मचाऱ्यांची वेतन देयके ही सेवार्थ प्रणालीद्वारे तयार करण्यात येतात. सेवार्थ प्रणाली व बीम्स प्रणाली यांची सांगड घातल्यामुळे आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी तयार केलेली वेतन देयके सेवार्थ प्रणालीमार्फत Forward to Beams या ऑप्शनचा वापर करुन बीडीएस काढून कोषागारात सादर केली जातात. वेतन देयकांची बीडीएस ही सेवार्थ प्रणालीमधूनच तयार होते. त्यासाठी बीम्स प्रणालीमधून लॉगीन करण्याची आवश्यकता भासत नाही.

माहे मार्च, २०१५ पासून सेवार्थ प्रणालीद्वारे यशस्वीरित्या काढण्यात आलेल्या बीडीएसची संख्या (देयकांची संख्या) खालीलप्रमाणे आहे :-

| | |
|---|---|
| १) | मार्च, २०१५ - ३६५६४ |
| २) | एप्रिल, २०१५ - ३४१८८ |
| ३) | मे, २०१५ - ३४३२५ |
| ४) | जून, २०१५ - ३८३१७ |

उपरोक्त आकड्यांवरुन असे दिसून येते की, सेवार्थ प्रणालीद्वारे तयार केलेल्या वेतन देयकांची बीडीएस सुरळीतपणे काढण्यात आली असून कर्मचाऱ्यांना त्यांचे वेतन नियमितपणे अदा करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यात इंदिरा आवास योजनेतून देण्यात येणा-या घरकुल योजना बंद असल्याबाबत

**(४२) १७४३८ (१४-०८-२०१५). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यात इंदिरा आवास योजनेतून देण्यात येणा-या घरकुल योजना बंद असून गेल्या वर्षात सुमारे एक हजाराहून अधिक घरकुलांची कामे आजही बंद असल्याचे दिनांक ९ मे, २०१५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अपूर्णावस्थेत असलेल्या घरकुलाचे कामकाज तातडीने पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करणार येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-१०-२०१५) :**(१) नाही.
(२) पंढरपूर तालुकयात सन २०१०-११ ते २०१४-१५ या कालावधीत ३४५६ घरकुलांना मंजूर देण्यात आली. मे, २०१५ अखेर यापैकी २६६२ घरकुले पूर्ण आहेत, उर्वरित ७९४ घरकुलांपैकी ४४९ घरकुले प्रगती पथावर आहेत व शिल्लक ३४५ घरकुलांचे बांधकाम लाभार्थ्यांनी अद्याप सुरु केले नसल्याने ती रद्द करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिंगोली जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये नविन घरकुले लाभार्थ्यांना देण्याबाबत

**(४३) १७४६४ (१७-०८-२०१५). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये सन १९९९-२००० या कालावधीतील इंदिरा आवास योजनेंतर्गत कच्चे घर दुरुस्तीसाठी काही लाभार्थ्यांना १०००० रुपये अनुदान देण्यात आले होते. परंतु सध्या ही घरे मोडकळीस आल्यामुळे सन २०१४-१५ मध्ये या लाभार्थ्यांना इंदिरा आवास योजनेतील नवीन घरकुले मंजूर करण्यात आली आहेत. मात्र या लाभार्थ्यांनी सन १९९९-२०००

मध्ये कच्ची घरे दुरुस्तीसाठी १०,००० रुपये घेण्यात आल्यामुळे त्यांना नविन मंजूर करण्यात आलेल्या घरकुलांचा लाभ देण्यात येत नसल्याचे माहे एप्रिल-मे २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन १९९९-२००० मध्ये घरकुल योजनेची कच्ची घरे दुरुस्ती करण्यासाठी देण्यात आलेले १०,००० रुपये अनुदान वजा करुन सन २०१४-१५ मध्ये नविन घरकुले सदरहू लाभार्थ्यांना देण्याबाबत मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.ग्रामविकास मंत्री व सचिव, ग्रामविकास यांना दिनांक १९ जानेवारी, २०१५ रोजी लेखी निवेदन दिल्यानुसार लाभार्थ्यांना घरकुले देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-१०-२०१५) :**(१) होय.
(२) होय.
इंदिरा आवास योजनेअंतर्गत नवीन घरकुलाचा लाभ देण्यासाठी पात्र घरकुल लाभार्थ्यांची असलेली मोठी संख्या विचारात घेऊन "घरकुल दुरुस्तीचा लाभ" व "नवीन घरकुलाचा लाभ" असे दोनही लाभ घेऊ नये म्हणून दि.८.९.२००८ रोजीच्या परिपत्रकान्वये "एखाद्या लाभार्थ्याने घर दुरुस्तीचा लाभ घेतल्यास त्यास नविन घरकुलाचा लाभ देता येणार नाही." अशा स्वरुपाच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.
इंदिरा आवास योजनेच्या जून, २०१३ च्या मार्गदर्शक तत्वातील परिच्छेद ३.२.२ मध्ये घरकुल दुरुस्ती संदर्भात सूचना दिलेल्या आहेत. घरकुल दुरुस्तीनंतर घरकुलाचे आयुष्य किमान ३० वर्षापर्यंत टिकले पाहिले, अशा स्वरुपाच्या सूचना आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हयामधील ५०० लोकसंख्या असलेल्या अनेक**
**वाड्या- वस्त्या-तांड्यांचा विकास करण्याबाबत**

**(४४) १७५९५ (१७-०८-२०१५). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्हयामधील ५०० लोकसंख्या असलेल्या अनेक वाड्या वस्त्या तांड्यांचा विकास झालेला नसल्याने याबाबत जिल्हा परिषद सदस्य व स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी नविन ग्रामपंचायत करावयाची गावे व ठिकाणी यासंबंधीचे निवेदन मा.ग्रामविकास मंत्री यांच्याकडे दिनांक १३ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नविन ग्रामपंचायत होणे अत्यंत आवश्यक असल्याने याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-१०-२०१५)** :(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) दिनांक १२ फेब्रुवारी, २००४ च्या शासन निर्णयानुसार स्वतंत्र ग्रामपंचायत करावयाच्या गावाची लोकसंख्या २००० असणे आवश्यक आहे. आदिवासी किंवा तांडा या भागांसाठी किंवा दोन गावात ३ कि.मी. पेक्षा जास्त अंतर असल्यास लोकसंख्या एक हजार असणे आवश्यक आहे. प्रकल्पामुळे पुनर्वसित ठिकाणी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्यासाठी लोकसंख्या किमान ३५० ते १००० असणे आवश्यक आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांना सोलापूर जिल्ह्यातील वाड्या, वस्त्या, तांडे येथे नविन ग्रामपंचायती स्थापन करणेबाबत नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना दिनांक २७ ऑगस्ट, २०१५ च्या शासनपत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.

---

## केंद्र शासनाच्या पंतप्रधान ग्रामसडक योजनेच्या धर्तीवर राज्यामध्ये मुख्यमंत्री ग्रामीण मार्ग योजना सुरु करण्याबाबत

**(४५) १७९७९ (१७-०८-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या पंतप्रधान ग्रामसडक योजनेच्या धर्तीवर राज्यामध्ये आमदार ग्राम योजना व मुख्यमंत्री ग्रामीण मार्ग योजना सुरु करण्याच्या राज्य शासनाच्या विचाराधीन प्रस्तावावर निर्णय घेण्यात आलेला आहे काय,

(२) असल्यास, उक्त दोन्ही योजनांची अंमलबजावणी अद्याप सुरु करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच उक्त प्रश्नी सादर केलेल्या प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) उक्त प्रश्नी सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झालेली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच राज्यातील ग्रामीण भागातील दुरवस्थेत असलेल्या रस्त्यांच्या बांधणीकरीता आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०७-१०-२०१५)** :(१), (२) व (३) दि. १८.३.२०१५ रोजी विधानमंडळात सादर झालेल्या २०१५-१६ च्या अर्थसंकल्पामध्ये, राज्यात मुख्यमंत्री ग्रामीण मार्ग योजना सुरु करण्याची घोषणा करण्यात आली आहे.

सदर योजना सुरु करण्याच्या अनुषंगाने मंत्रीमंडळासमोर आवश्यक तो प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे. मंत्रीमंडळाच्या मान्यतेनंतर या योजनेची रुपरेषा अंतिम होईल.

राज्यात आमदार आदर्श ग्राम योजना राबिवण्याचा निर्णय राज्य शासनाने दिनांक २०.५.२०१५ च्या शासन निर्णयान्वये घेतलेला आहे.

आमदार आदर्श ग्राम योजना केंद्र शासनाच्या सांसद आदर्श ग्राम योजनेच्या धर्तीवर राबविण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत प्रत्येक आमदार यांच्या मतदार संघातील जुलै, २०१९ पर्यंत तीन ग्रामपंचायती आदर्श म्हणून विकसित करतील. निवडण्यात येणाऱ्या ग्रामपंचायतीची लोकसंख्या किमान १००० असावी.

या योजनेच्या अंमलबजावणीसाठी ग्रामपंचायतींची निवड करुन दिनांक १५.८.२०१५ पर्यंत सर्व संबंधित जिल्हाधिकारी यांना कळविण्याची विनंती सर्व मा.आमदारांना शासन पत्र दिनांक १४.७.२०१५ अन्वये केलेली आहे.

(४) ग्राम विकास विभागामार्फत इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्गासाठी ३०५४ अंतर्गत देखभाल दुरुस्तीस्तव लांबीच्या प्रमाणात निधी वितरीत केला जातो. तर जिल्हा नियोजन समितीमार्फत ५०५४ व ३०५४ अंतर्गत निधी दिला जातो.

---

## नाशिक जिल्ह्यातील पंतप्रधान ग्रामसडक योजनेतील कामे निधी अभावी बंद पडली असल्याबाबत

**(४६) १८२३९ (१४-०८-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी मंजूर कृती आराखड्यानुसार पंतप्रधान ग्रामसडक योजनेसाठी राज्यात ८ हजार ३०० कोटी ८५ लाखांचा निधीची आवश्यकता असताना शासनाने केवळ ३०० कोटी रुपये मंजुर केल्यामुळे राज्यात रस्त्यांचा विकास प्रलंबित राहणार आहे, हे खरे आहे काय,

(२) नाशिक जिल्ह्यातील पंतप्रधान ग्रामसडक योजनेतील ४५ हून अधिक कामे निधी अभावी बंद पडली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पंतप्रधान ग्रामसडक योजनेच्या मंजुर कृती आराखड्यानुसार निधी उपलब्ध होण्याकरिता शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-१०-२०१५) :**(१) केंद्र शासनाने प्रधानमंत्री याेजना भाग-१ च्या टप्पा-१०, ११ करीता व टप्पा १२, तसेच प्रधानमंत्री योजना भाग-२ करीता एकूण रु.३००४ कोटीचा कार्यक्रम सन २०१२ ते २०१५ या कालावधीत मंजूर केला आहे. सदर मंजूर कामांच्या अनुषंगाने सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात रु. २०७ कोटी निधी वितरित केला असून सन २०१५-१६ मध्ये रु.२९१ कोटी इतका नियतव्यय केंद्र शासनाने निश्चित केला आहे.

(२) प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या कामांच्या प्रमाणात कमी निधी केंद्र शासनाकडून प्राप्त झाल्याने योजनेच्या कामावर परिणाम झाला आहे.

(३) व (४) राज्यास आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यासाठी पाठपुरावा करण्यात आलेला आहे.

केंद्र शासनाच्या अधिकाऱ्यासोबतच्या प्रादेशिक आढावा बैठकांमध्येही राज्यस पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी करण्यात आलेली आहे. राज्याची निधीची मागणी मांडण्याकरिता मा.मंत्री (ग्राम विकास) महोदया व मा.राज्यमंत्री (ग्रामविकास) यांनी दिनांक १ जून, २०१५ रोजी मा.केंद्रीय वित्त मंत्री व केंद्रीय ग्रामविकास मंत्री नवी दिल्ली येथे भेट घेतली आहे. त्याचप्रमाणे मा.मुख्यमंत्री यांनी त्यांच्या दि.१.८.२०१५ च्या पत्रान्वये मा.प्रधानमंत्री व मा.केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री यांना निधी वितरीत करणेबाबत विनंती केली आहे.

---

## रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर तालुक्यातील १२६ पैकी ५६ ग्रामपंचायतीत संगणक इंटरनेटविना असल्याबाबत

**(४७) १८४१२ (१७-०८-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर तालुकयातील १२६ पैकी ५३ ग्रामपंचायती मध्ये संगणक असूनही इंटरनेटविना आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोणत्याही कंपनीचे नेटवर्क नसल्यामुळे सदर ग्रामपंचायतींना ऑनलाईन कामासाठी जवळपासची ग्रामपंचायत किंवा शहराच्या ठिकाणी येवून सायबर कॅफेचा आधार घ्यावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ५३ ग्रामपंचायती ऑफलाईन असल्याने गतिमान कारभारापासून वंचित राहिल्या आहेत, परिणामी या गावांच्या विकासावर त्याचा परिणाम झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या ग्रामपंचायती ऑनलाईन करुन त्याचे कामकाज गतिमान करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०७-१०-२०१५) :**(१) संगमेश्वर तालुक्यातील १२६ पैकी ५१ ग्रामपंचायती मध्ये आवश्यक क्षमतेची इंटरनेट सुविधा उपलब्ध नाही.

(२) अंशत: खरे आहे.

इंटरनेट सुविधा नसलेल्या ग्रामपंचायतीचे ऑनलाईन काम लगतच्या इंटरनेट सुविधा असलेल्या ग्रामपंचायतीमध्ये अथवा पंचायत समितीमध्ये करण्यात येते.

(३) इंटरनेट सुविधा नसलेल्या ग्रामपंचायतीच्या दैनंदिन कामकाजासाठी संग्राम सॉफ्ट हे ऑफलाईन चालणारे सॉफ्टवेअर उपलब्ध करुन दिले आहे. त्यावर या ग्रामपंचायतीचे कामकाज होत आहे.

(४) जिल्हा परिषद रत्नागिरीकडून भारत संचार नियम लिमिटेड (बी.एस.एन.एल) कडे इंटरनेट नसलेल्या ग्रामपंचायतीना इंटरनेट व दूरध्वनी सेवा उपलब्ध करुन देण्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच नॅशनला ऑप्टीकल फायबर नेटवर्क (NOFN) अंतर्गत राज्यातील सर्वच ग्रामपंचायतीना ऑप्टीकल फायबर नेटवर्कद्वारे उच्च क्षमतेची इंटरनेट सेवा उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु झालेली आहे. त्यात संगमेश्वर तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतीनाही सुविधा उपलब्ध होणार आहे.

(५) विलंब झालेला नाही.

---

**मालवण तालुक्यात इंदिरा आवास योजनेअंतर्गत १९७ लाभार्थ्यांची घरे पूर्ण होऊनही दुसऱ्या हप्त्याची रक्कम लाभर्थ्यांना मिळालेली नसल्याबाबत**

**(४८) १८६३२ (१४-०८-२०१५). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण तालुक्यात सन २०१३-२०१४ मध्ये इंदिरा आवास योजनेअंतर्गत १९७ लाभार्थ्यांची घरे पूर्ण होऊनही दुसऱ्या हप्त्याची रक्कम लाभर्थ्यांना अद्याप मिळालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार लाभार्थ्यांना दुसऱ्या हप्त्याची रक्कम देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०९-२०१५) :**(१) होय.

(२) होय.

(३) जिल्हास्तरावरुन पडताळणी केली असता गट विकास अधिकारी, मालवण यांनी मंजूर केलेल्या २७० घरकुलांपैकी १९७ घरकुले ही मालवण तालुक्याच्या कायम प्रतिक्षा यादीमधील नसल्याचे आढळून आले आहे.

(४) विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी १९७ घरकुलांच्या सुधारित यादीस दिनांक २३.७.२०१५ अन्वये मान्यता दिली असून लाभार्थ्यांना उर्वरित वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सिंधुदूर्ग जिल्हयात प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या दुस-या भागात २० रस्त्यांना मंजूरी देण्याबाबत**

**(४९) १८९०९ (१४-०८-२०१५). श्री.संजय कदम (दापोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग जिल्हयात प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या दुस-या भागात २० रस्त्यांना मंजूरी माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान मिळाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्याच्या कामासाठी ५२ कोटी एवढा निधी मंजूर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रस्त्यांच्या कामासाठी मंजूर झालेली निधी अद्याप मिळाला नसल्याने एकही रस्त्याची कामे सुरु झाली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, निधी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-१०-२०१५) :**(१) व (२) सिंधुदुर्ग जिल्हयातील १७ रस्ते व ३ पुल अशी रु. ५३.८८ कोटी किंमतीची २० कामे केंद्र शासनाने प्रधानमंत्री ग्राम सडक योजना भाग-२ अंतर्गत फेब्रुवारी व मे, २०१४ मध्ये मंजूर केलेली आहेत.

(३) अंशत: खरे आहे.

सदर कामांपैकी वाडात्तर टेंबवली ताम्हाणनगर रस्ता हे काम CRZ मंजूरी अभावी सुरु करण्यात आले नसून इतर सर्व कामे सुरु आहेत.

(४) सदर प्रश्नाच्या भाग (१) मध्ये नमूद कामांसाठी शासनाने रु.१२०.३० लक्ष इतका निधी उपलब्ध करुन दिला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाडा (जि.ठाणे) तालुक्यातील आबिटघर-साठेपाडा रस्त्यावर खडीकरण व मजबुतीकरणाच्या कामात झालेला गैरव्यवहार**

**(५०) १९०४८ (१४-०८-२०१५). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा तालुक्यातील (जि.ठाणे) आबिटघर- साठेपाडा रस्त्यावर खडीकरण व मजबुतीकरण न करताच रुपये ८ लाखाचे बिल काढल्याचे दिनांक १ मे, २०१५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०७-१०-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.